| पुणे पोलीस | वाहतुक शाखा, पुणे शहर<br>पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,<br>बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे | |
|---|---|---|

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ /२०२४ दिनांक :- /०१/२०२४

## प्रसिध्दीपत्रक

**विषय :- श्री. मनाज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण मोर्चा वेळी वाहतूक पर्यायी मार्गाने वळविणेबाबत.**

श्री. मनोज जरांगे पाटील यांचा मराठा आरक्षण मोर्चा दि. २३/०१/२०२४ रोजी रांजणगांव येथुन निघुन कोरेगांव भिमा मार्गे चोखीदाणी, खराडी येथे मुक्कामी थांबणार असून दि. २४/०१/२०२४ रोजी चोखीदाणी, खराडी येथुन निघुन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीतून लोणावळा येथे मुक्कामी थांबणार आहे. श्री. मनोज जरांगे पाटील यांच्या मोर्च्यामध्ये मोठया संख्येने मराठा बांधव वाहनांसह सहभागी होणार असल्याने मार्चा मार्गावर व आजुबाजुचे परिसरात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. यास्तव सदर परिसरातील वाहतूक सुरळीत राहणेकरीता तसेच सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन सदर परिसरातील वाहतूकीत बदल करणे आवश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी शशिकांत बोराटे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर वाहतूकीत खालीलप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात आवश्यकतेनुसार करण्यात येणार आहेत.

❖ **दि.२३/०१/२०२४ रोजी मराठा आरक्षण मार्चा रांजणगांव येथुन निघुन नगर रोडने कोरेगांव भिमा मार्गे चोखीदाणी, खराडी येथे मुक्कामाकरीता थांबणार आहे.**

**दि.२३/०१/२०२४ रोजी ०३.०० वा. पासून आवश्यकतेप्रमाणे** अहमदनगर कडे जाणारी सर्व प्रकारची वाहतूक खालीलप्रमाणे वळविण्यात येईल.

१) मुंबई – पुणे द्रुतगती मार्गावरुन तसेच कोल्हापूर, सातारा येथुन अहमदनगरकडे जाणारी सर्व प्रकारची वाहने कात्रज – खडी मशिन चौक - मंतरवाडी फाटा - हडपसर मार्गे सोलापूर रोडने केडगांव चौफुला – नाव्हरे – शिरुर मार्गे जातील.

२) वाघोली,लोणीकंद मार्गे अहमदनगरकडे जाणारी सर्व प्रकारची थेऊर फाटा (सोलापूर रोड) येथुन वाहतूक केडगांव चौफुला – नाव्हरा मार्गे शिरुर ते अहमदनगर अशी वळविण्यात येईल.

३) पुणे शहरातून अहमदनगरकडे जाणारी सर्व प्रकारची वाहने खराडी बायपास उजवीकडे वळण घेवून मगरपट्टा चौक – डावीकडे वळण घेवून सोलापूर रोडने यवत – केडगांव चौफुला – नाव्हरे – शिरुर मार्गे जातील.

❖ **दि. २३/०१/२०२४ रोजी मराठा आरक्षण मोर्चा चोखीदाणी, खराडी परिसरामध्ये मुक्कामी राहणार आहे व पुढे दि. २४/०१/२०२४ रोजी पुणे शहरामधुन पिंपरी चिंचवड आयुक्तालय हद्दीमध्ये जाणार आहे. त्याअनुषंगाने सर्व प्रकारची वाहतूक दि.२४/०१/२०२४ रोजी आवश्यकते प्रमाणे खालीलप्रमाणे वळविण्यात येईल.**

१) अहमदनगर कडून पुणे शहराकडे येणारी सर्व वाहने थेऊर फाटा (लोणीकंद) येथुन केसनंद – थेऊर मार्गे सोलापूर रोड अशी वळविण्यात येतील.

२) वाघोली परिसरामधील वाहने वाघोली - आव्हाळवाडी - मांजरी खुर्द - मांजरी बुद्रुक – केशवनगर - मुंढवा चौक अशी वळविण्यात येतील.

३) पुणे शहरामधुन अहमदनगरकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना चंद्रमा चौकातून आळंदी रोड जंक्शन, विश्रांतवाडी – धानोरी - लोहगांव - वाघोली मार्गे अहमदनगरकडे अशी वळविण्यात येईल.

मराठा आरक्षण मोर्चा जसजसा पुढे मार्गस्थ होईल, त्याप्रमाणे मोर्चाचे मागील वाहतूक सुरळीत करण्यात येणार आहे. तरी वाहनचालकांनी वर नमुद वाहतूक बदलांचा अवलंब करुन वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे असे आवाहन वाहतूक शाखेतर्फे करण्यात येत आहे.

21.1.24

**( शशिकांत बोराटे )**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**प्रत सविनय सादर,**

१.मा.पोलीस आयुक्त,सो., पुणे शहर.
२.मा.पोलीस सह आयुक्त, सो., पुणे शहर.